जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 FEB 2025
सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात 'मराठा स्वराज्य निर्मिती : एक अवलोकन' या पुस्तकाचे प्रकाशन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह मान्यवर.

# 'मराठा स्वराज्य निर्मिती'चे प्रकाशन

**कोल्हापूर :** डॉ. सुमित्रा कुलकर्णी लिखित आणि डॉ. अवनिश पाटील संपादित 'मराठा स्वराज्य निर्मिती : एक अवलोकन' या पुस्तकाचे शिवजयंतीचे औचित्य साधून शिवाजी विद्यापीठात प्रकाशन करण्यात आले. विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागातर्फे ३५० व्या शिवस्वराज्य दिनाच्या निमित्ताने गतवर्षी २६ फेब्रुवारीला छत्रपती शिवाजी महाराज व्याख्यानमालेतंर्गत 'मराठा स्वराज्य निर्मिती : एक अवलोकन' या विषयावर ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ तथा सावित्रीबाई फुले, पुणे विद्यापीठाच्या माजी इतिहास अधिविभाग प्रमुख डॉ. सुमित्रा कुलकर्णी यांचे विशेष व्याख्यान आयोजित केले होते. या व्याख्यानाचे संपादित पुस्तक रूपाने प्रकाशन करावे, अशी सूचना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केली होती. त्यानुसार इतिहास अधिविभाग प्रमुख डॉ. अवनिश पाटील यांनी संपादित केलेल्या या पुस्तकाचे कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह मान्यवर अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत प्रकाशन झाले. विद्यापीठाचा इतिहास अधिविभाग आणि छत्रपती संभाजी महाराज संशोधन केंद्र यांच्यातर्फे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. नीलांबरी जगताप, दत्तात्रय मचाले आदी उपस्थित होते.

21 FEB 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पोर्तुगालच्या सांस्कृतिक दूतांची विद्यापीठास भेट

प्रतिनिधी
कोल्हापूर

गोवा येथील पोर्तुगीज दूतावास सांस्कृतिक केंद्राचे प्रतिनिधी डॉ. डेल्फीम कोरेइया दा सिल्वा यांनी शिवाजी विद्यापीठास सदिच्छा भेट दिली. पोर्तुगीज आणि मराठी भाषा यांमधील सांस्कृतिक बंध दृढ करण्यासाठी सहकार्यवृद्धी करण्याच्या अनुषंगाने त्यांनी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याशी चर्चा केली.

शिवाजी विद्यापीठाच्या विदेशी भाषा विभागाने 'द कमॉइश इन्स्टिट्यूट फॉर को-ऑपरेशन अँड लँग्वेज', लिस्बन (पोर्तुगाल) या संस्थेसमवेत सन २०२३ मध्ये सामंजस्य करार केला आहे. या कराराअंतर्गत पोर्तुगीज भाषा आणि संस्कृती प्रसार, शिक्षक प्रशिक्षण, तसेच वैज्ञानिक आणि सांस्कृतिक प्रकल्पांच्या अंमलबजावणीमध्ये सहकार्य इत्यादी बाबींचा समावेश आहे. पोर्तुगीज भाषा अभ्यासक्रम सुरु करणारे शिवाजी विद्यापीठ महाराष्ट्रातील पहिले व एकमेव विद्यापीठ आहे. शिवाजी विद्यापीठात पोर्तुगीज भाषेचा एक वर्षाचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु आहे. डॉ. सिल्वा यांनी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्याशी सामंजस्य कराराच्या प्रगतीविषयी सविस्तर चर्चा केली. करारात ठरल्यानुसार २ लाख ५० हजार ७४९ रुपयांचा धनादेशही शिवाजी विद्यापीठासाठी त्यांनी कुलगुरूंकडे सुपूर्द केला. दोन्ही शैक्षणिक संस्थांदरम्यान विद्यार्थी-शिक्षक एक्स्चेंज उपक्रम तसेच संशोधकांसाठी २० दिवसांचा पोर्तुगालचा अभ्यासदौरा आणि पोर्तुगाल भाषेच्या अभ्यासक्रमाचा विस्तार या अनुषंगाने चर्चा करण्यात आली. यावेळी विदेशी भाषा विभागाच्या प्रमुख डॉ. मेघा पानसरे, ऐश्वर्या चव्हाण उपस्थित होत्या.



**कोल्हापूर : पोर्तुगीज दूतावास सांस्कृतिक केंद्राचे प्रतिनिधी डॉ. डेल्फीम कोरेइया दा सिल्वा यांचे ग्रंथभेट देऊन शिवाजी विद्यापीठात स्वागत करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के.**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 FEB 2025
पुण्यनगरी



कोल्हापूर : पोर्तुगीज दूतावास सांस्कृतिक केंद्राचे प्रतिनिधी डॉ. डेल्फीम कोरेइया दा सिल्वा यांचे ग्रंथभेट देऊन स्वागत करताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के.

# पोर्तुगालच्या सांस्कृतिक दूतांची विद्यापीठास भेट

**कोल्हापूर :** गोवा येथील पोर्तुगीज दूतावास सांस्कृतिक केंद्राचे प्रतिनिधी डॉ. डेल्फीम कोरेइया दा सिल्वा यांनी नुकतीच शिवाजी विद्यापीठास सदिच्छा भेट दिली. यावेळी पोर्तुगीज आणि मराठी भाषा यांमधील सांस्कृतिक बंध दृढ करण्यासाठी सहकार्यवृद्धी करण्याच्या अनुषंगाने त्यांनी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्याशी चर्चा केली.

शिवाजी विद्यापीठाच्या विदेशी भाषा विभागाने 'द कमॉइश इन्स्टिट्यूट फॉर को-ऑपरेशन अँड लँग्वेज', लिस्बन (पोर्तुगाल) या संस्थेसमवेत सन २०२३ मध्ये सामंजस्य करार केला आहे. या कराराअंतर्गत पोर्तुगीज भाषा आणि संस्कृती प्रसार, शिक्षक प्रशिक्षण, तसेच वैज्ञानिक आणि सांस्कृतिक प्रकल्पांच्या अंमलबजावणीमध्ये सहकार्य इत्यादी बाबींचा समावेश आहे. पोर्तुगीज भाषा अभ्यासक्रम सुरु करणारे शिवाजी विद्यापीठ महाराष्ट्रातील पहिले व एकमेव विद्यापीठ आहे. शिवाजी विद्यापीठात पोर्तुगीज भाषेचा एक वर्षाचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु आहे.

डॉ. सिल्वा यांनी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्याशी सामंजस्य कराराच्या प्रगतीविषयी सविस्तर चर्चा केली. तसेच करारात ठरल्यानुसार २,५०,७४९ रुपयांचा धनादेशही विद्यापीठासाठी कुलगुरूंकडे सुपूर्द केला. दोन्ही शैक्षणिक संस्थांदरम्यान विद्यार्थी-शिक्षक एक्स्चेंज उपक्रम तसेच संशोधकांसाठी २० दिवसांचा पोर्तुगालचा अभ्यासदौरा आणि पोर्तुगाल भाषेच्या अभ्यासक्रमाचा विस्तार या अनुषंगाने चर्चा करण्यात आली. यावेळी विदेशी भाषा विभागाच्या प्रमुख डॉ. मेघा पानसरे, ऐश्वर्या चव्हाण उपस्थित होत्या.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 FEB 2025
सकाळ

# पोर्तुगालच्या सांस्कृतिक दूतांची शिवाजी विद्यापीठास सदिच्छा भेट

## अडीच लाखांचा धनादेश कुलगुरुंकडे सुपूर्द

कोल्हापूर, ता. २० : गोवा येथील पोर्तुगीज दुतावास सांस्कृतिक केंद्राचे प्रतिनिधी डॉ. डेल्फीम कोरेइया दा सिल्वा यांनी नुकतीच शिवाजी विद्यापीठास सदिच्छा भेट दिली. यावेळी पोर्तुगीज आणि मराठी भाषा यांमधील सांस्कृतिक बंध दृढ करण्यासाठी सहकार्यवृद्धी करण्याच्या अनुषंगाने त्यांनी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याशी चर्चा केली.

विद्यापीठाच्या विदेशी भाषा विभागाने 'द कमॉइश इन्स्टिट्यूट फॉर को-ऑपरेशन अँन्ड लँग्वेज', लिस्बन (पोर्तुगाल) या संस्थेसमवेत २०२३ मध्ये सामंजस्य करार केला. पोर्तुगीज भाषा अभ्यासक्रम सुरू करणारे शिवाजी विद्यापीठ महाराष्ट्रातील पहिले व एकमेव विद्यापीठ आहे. डॉ. सिल्वा यांनी करारात ठरल्यानुसार २ लाख ५० हजार ७४९ रुपयांचा धनादेशही विद्यापीठासाठी कुलगुरूंकडे सुपूर्द केला. दोन्ही शैक्षणिक संस्थांदरम्यान विद्यार्थी-शिक्षक एक्स्चेंज उपक्रम तसेच संशोधकांसाठी २० दिवसांचा पोर्तुगालचा अभ्यास दौरा आणि पोर्तुगाल भाषेच्या अभ्यासक्रमाचा विस्तार या अनुषंगाने चर्चा झाली. विदेशी भाषा विभागाच्या प्रमुख डॉ. मेघा पानसरे, ऐश्वर्या चव्हाण उपस्थित होत्या.



कोल्हापूर : डॉ. डेल्फीम कोरेइया दा सिल्वा यांचे ग्रंथभेट देऊन शिवाजी विद्यापीठात स्वागत करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 FEB 2025

पुढारी

# पोर्तुगालच्या सांस्कृतिक दूतांची शिवाजी विद्यापीठास सदिच्छा भेट

**कोल्हापूर :** गोवा येथील पोर्तुगीज दूतावास सांस्कृतिक केंद्राचे प्रतिनिधी डॉ. डेल्फीम कोरेइया दा सिल्वा यांनी शिवाजी विद्यापीठास सदिच्छा भेट दिली. यावेळी पोर्तुगीज व मराठी भाषा यांमधील सांस्कृतिक बंध दृढ करण्यासाठी सहकार्यवृद्धी करण्याच्या अनुषंगाने त्यांनी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याशी चर्चा केली. विद्यापीठाच्या विदेशी भाषा विभागाने 'द कमॉइश इन्स्टिट्यूट फॉर को-ऑपरेशन अँड लँग्वेज', लिस्बन (पोर्तुगाल) या संस्थेसमवेत २०२३ मध्ये सामंजस्य करार केला आहे. करारांतर्गत पोर्तुगीज भाषा आणि संस्कृती प्रसार, शिक्षक प्रशिक्षण, तसेच वैज्ञानिक आणि सांस्कृतिक प्रकल्पांच्या अंमलबजावणीमध्ये सहकार्य आदी बाबींचा समावेश आहे. यावेळी डॉ. सिल्वा यांनी कुलगुरू डॉ. शिर्के यांच्याशी सामंजस्य कराराच्या प्रगतीविषयी चर्चा केली. करारात ठरल्यानुसार २ लाख ५० हजार ७४९ रुपयांचा धनादेश त्यांनी कुलगुरूंकडे सुपूर्द केला. दोन्ही शैक्षणिक संस्थांदरम्यान विद्यार्थी-शिक्षक एक्स्चेंज उपक्रम तसेच संशोधकांसाठी २० दिवसांचा पोर्तुगालचा अभ्यासदौरा व पोर्तुगाल भाषेच्या अभ्यासक्रमाचा विस्ताराच्या अनुषंगाने चर्चा करण्यात आली. यावेळी विदेशी भाषा विभागाच्या प्रमुख डॉ. मेघा पानसरे, ऐश्वर्या चव्हाण उपस्थित होत्या.



**कोल्हापूर : डॉ. डेल्फीम कोरेइया दा सिल्वा यांचे ग्रंथभेट देऊन स्वागत करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के.** (छाया : नाज ट्रेनर)

21 FEB 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गुरुवर्य डी. डी. आसगावकर गौरव पुरस्कारांचे उद्या वितरण

## ट्रस्टचे अध्यक्ष आमदार जयंत आसगावकर यांची माहिती : पुरस्कार प्राप्त शिक्षकांची नावे जाहीर

प्रतिनिधी

वाकरे

कुडित्रे (ता. करवीर) येथील गुरुवर्य डी. डी. आसगावकर शैक्षणिक, सांस्कृतिक व क्रीडा विकास ट्रस्टच्या वतीने सांगरुळ शिक्षण संस्थेचे संस्थापक व सेक्रेटरी स्वर्गीय गुरुवर्य डी. डी. आसगावकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त शनिवार २२ रोजी दुपारी १.३० वा. राजर्षी शाहू स्मारक भवन, दसरा चौक, कोल्हापूर येथे उल्लेखनीय काम केलेल्या जिल्ह्यातील शिक्षकांना गुरुवर्य डी. डी. आसगावकर पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे, अशी माहिती ट्रस्टचे अध्यक्ष व संस्थेचे सेक्रेटरी आमदार प्रा. जयंत आसगावकर व कार्यकारी विश्वस्त, संस्थेचे खजाननीस डी. जी. खाडे यांनी पत्रकार बैठकीत दिली.



समितीमार्फत पुरस्कारप्राप्त सेवकांची निवड करण्यात येते. त्याचबरोबर शाळेत प्रथम क्रमांक मिळवलेल्या विद्यार्थ्यांना पुरस्कार देण्यात येणार आहे. आमदार सतेज पाटील यांच्या हस्ते आणि शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या अध्यक्षतेखाली हा कार्यक्रम होणार आहे.

पुरस्कार विजेत्यांमध्ये – कर्मवीर शिक्षण विठ्ठल रामजी शिंदे शिक्षण संस्था, गडहिंग्लज, प्रा. डॉ. गोविंद कोळेकर (रसायनशास्त्र विभाग शिवाजी विद्यापीठ), श्रेणिक पाटील (चिंचवाड हायस्कूल), मंजुषा रावळ (बालाजी विद्यालय इचलकरंजी), संजय कुंभार (महाराणी राधाबाई प्रशाला गडहिंग्लज), रमेश देसाई (मोहनलाल दोशी विद्यालय अर्जुननगर) जयसिंग पाटील (मोहरे हायस्कूल), महादेव शिवनगेकर (बागीलगे विद्यालय), अस्मिता पाटील (व्यंकटराव हायस्कूल आजरा), सुनील ढोकरे (नागेश्वर हायस्कूल राशिवडे), अलका पाटील (बळवंतराव हायस्कूल पेठ वडगाव), प्रदीप पाटील (आयटीआय कोपार्डे), कृष्णा बंडू निंबाळकर (श्रीराम कॉलेज कुडित्रे), विजयकुमार गावडे (विद्या मंदिर वालूर), संजय पाटील (आदर्श विद्यालय कोथळी) अमृत देसाई (गारगोटी हायस्कूल) यांचा समावेश आहे. पत्रकार बैठकीला उपाध्यक्ष के. ना. जाधव, सहसचिव डी. एन. कुलकर्णी, संचालक बी. आर. नाळे, आनंदा कासोटे, सदाशिव खाडे, मदन पाटील, इंदूताई आसगावकर, गणपती नाळे, प्रमोद आसगावकर उपस्थितहोते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 FEB 2025

पुण्यनगरी

# डी. डी. आसगावकर पुरस्काराचे उद्या वितरण

## आ. प्रा. जयंत आसगावकर; एक संस्था, १५ मान्यवरांचा होणार गौरव

कोगे : प्रतिनिधी

कुडित्रे, ता. करवीर येथील गुरुवर्य डी. डी. आसगावकर शैक्षणिक, सांस्कृतिक व क्रीडा विकास ट्रस्टच्या वतीने सांगरूळ शिक्षण संस्थेचे संस्थापक, सेक्रेटरी डी. डी. आसगावकर यांच्या १८ व्या स्मृतिदिनानिमित्त शनिवार, दि. २२ रोजी दुपारी १.३० वाजता राजर्षी शाहू स्मारक भवन, दसरा चौक, कोल्हापूर येथे जिल्ह्यातील शिक्षकांना गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. या पुरस्काराचे वितरण आमदार सतेज पाटील यांच्या हस्ते आणि शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या प्रमुख उपस्थित होणार आहे, अशी माहिती ट्रस्टचे अध्यक्ष आमदार प्रा. जयंत आसगावकर यांनी बैठकीत दिली.



आमदार आसगावकर म्हणाले, यंदा एका संस्थेची व १५ मान्यवरांची पुरस्कारांसाठी निवड केली आहे. यामध्ये कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे संस्था, गडहिंग्लज, तर गोविंद कोळेकर (कोल्हापूर), श्रेणिका पाटील (करवीर), मंजूषा रावळ (इचलकरंजी), संजय कुंभार (गडहिंग्लज), रमेश देसाई (कागल), जयसिंग पाटील (पन्हाळा), महादेव शिवनगेकर (चंदगड), अस्मिता पाटील (आजरा), सुनील ढोकरे (राधानगरी), अलका पाटील (हातकणंगले), प्रदीप पाटील (करवीर), कृष्णा निंबाळकर (कुडित्रे), विजय गावडे (शाहूवाडी), अमृत देसाई (भुदरगड) या मान्यवरांचा समावेश आहे. पुरस्काराचे हे सहावे वर्ष आहे. या बैठकीला संस्थेचे अध्यक्ष यशवंतराव खाडे, उपाध्यक्ष के. ना. जाधव, सहसचिव डी. एन. कुलकर्णी, संचालक बी. आर. नाळे, आनंदा कासोटे, सदाशिव खाडे, मदन पाटील, डॉ. एम. एन. ठाणेकर, निवृत्ती चाबूक, श्रीमती इंदुताई आसगावकर, गणपती नाळे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 FEB 2025

पुण्यनगरी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठामध्ये 'दर्पण'कार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला.

# विद्यापीठात बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती

**कोल्हापूर :** मराठी पत्रकारितेचे आद्य संपादक 'दर्पण'कार बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती शिवाजी विद्यापीठात उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनात कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कुलसचिव डॉ. विलास शिंदे, वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र अधिविभागाच्या प्रमुख डॉ. निशा-मुडे पवार, डॉ. शिवाजी जाधव, राष्ट्रीय सेवा योजना तथा विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. तानाजी चव्हाण, उपकुलसचिव डॉ. प्रमोद पांडव, डॉ. सुमेधा साळुंखे, जयप्रकाश पाटील, सुधाकर बर्गे यांच्यासह विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 FEB 2025
लोकमत

# बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** मराठी पत्रकारितेचे आद्य संपादक 'दर्पण'कार बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती शिवाजी विद्यापीठात उत्साहात साजरी करण्यात आली.

मुख्य प्रशासकीय भवनात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र अधिविभागाच्या प्रमुख डॉ. निशा-मुडे पवार, डॉ. शिवाजी जाधव, राष्ट्रीय सेवा योजना तथा विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. तानाजी चव्हाण, उपकुलसचिव डॉ. प्रमोद पांडव उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 FEB 2025
सकाळ

# बाळशास्त्री जांभेकरांना विद्यापीठात अभिवादन

कोल्हापूर : मराठी पत्रकारितेचे आद्य संपादक 'दर्पण'कार बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती शिवाजी विद्यापीठात उत्साहात झाली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. निशा मुडे-पवार, डॉ. शिवाजी जाधव, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. तानाजी चव्हाण, उपकुलसचिव डॉ. प्रमोद पांडव, डॉ. सुमेधा साळुंखे, जयप्रकाश पाटील, सुधाकर बर्गे, आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 FEB 2025

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती साजरी

**कोल्हापूर :** मराठी पत्रकारितेचे आद्य संपादक 'दर्पण'कार बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती शिवाजी विद्यापीठात उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र अधिविभागाच्या प्रमुख डॉ. निशा-मुडे पवार, डॉ. शिवाजी जाधव, राष्ट्रीय सेवा योजना तथा विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. तानाजी चव्हाण, उपकुलसचिव डॉ. प्रमोद पांडव, डॉ. सुमेधा साळुंखे, जयप्रकाश पाटील, सुधाकर बर्गे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 FEB 2025

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात जांभेकरांना अभिवादन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात मराठी पत्रकारितेचे आद्य संपादक 'दर्पण'कार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त गुरूवारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र अधिविभागप्रमुख डॉ. निशा-मुडे पवार, डॉ. शिवाजी जाधव, डॉ. तानाजी चव्हाण, उपकुलसचिव डॉ. प्रमोद पांडव, डॉ. सुमेधा साळुंखे, जयप्रकाश पाटील, सुधाकर बर्गे आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 FEB 2025

पुढारी

# आवाज हे अभिनयाचे प्रभावी माध्यम : ज्येष्ठ रंगकर्मी वर्तक

**कोल्हापूर :** आवाज हे अभिनयाचे प्रभावी माध्यम आहे, असे प्रतिपादन पुणे येथील ज्येष्ठ रंगकर्मी प्रभाकर वर्तक यांनी केले. शिवाजी विद्यापीठ, संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागातर्फे 'आवाज, अभिनय आणि रंगभूमीच्या वेगळ्या वाटा' या विषयावर दोन दिवसीय नाट्य कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक म्हणून ते बोलत होते. कार्यशाळेसाठी वर्तक यांनी आवाज आणि अभिनय परस्पर संबंध कसा असतो, आवाज निर्मिती कशी होते, आवाज कसा असावा, आवाजातील गुण-दोष कोणते, आवाजाचे मूल्यमापन कसे करावे, याविषयी मार्गदर्शन केले. तसेच त्यांनी भाषेचे गुण-दोष, भावनादर्शकता, प्राणायमाचे प्रकार व त्यांची प्रात्यक्षिके, योग्य उच्चार पद्धती व प्रात्यक्षिके, संवाद कसा समजून घ्यावा, रंगभूमीवर सामाजिक प्रश्नांसाठी वापरल्या गेलेल्या पद्धती - प्लेबॅक थिएटर आणि फोरम थिएटर इ. अनेक विषयांवर विचार मांडले. संगीत व नाट्यशास्त्र विभागाचे विभागप्रमुख डॉ. विनोद ठाकुरदेसाई यांनी स्वागत केले. डॉ. राजश्री खटावकर यांनी आभार मानले. नाट्य कार्यशाळेचे व्यवस्थापन मल्हार जोशी व अतुल परीट यांनी केले. यावेळी नाट्यशाखेचे डॉ. संजय तोडकर, रवीदर्शन कुलकर्णी, राज पाटील, युवराज केळुसकर, किरणसिंह चव्हाण उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 FEB 2025
पुढारी

# आंतरराष्ट्रीय मानसशास्त्र परिषदेसाठी डॉ. जगन कराडे फिलिपाईन्सला रवाना

**कोल्हापूर :** आंतरराष्ट्रीय कॉंग्रेसच्या वतीने दि. २१ ते २५ फेब्रुवारी या कालावधीत फिलिपाईन्स येथे आयोजित परिषदेसाठी शिवाजी विद्यापीठाच्या समाजशास्त्र अधिविभागातील प्रा. डॉ. जगन कराडे रवाना झाले आहेत. परिषदेतील 'जागतिक मानसिक आरोग्य' या विषयावरील परिसंवादात 'मानसिक आरोग्य आणि सामाजिक असमानता' या विषयावर बोलण्यासाठी डॉ. कराडे यांना विशेषतः आमंत्रित करण्यात आले आहे.

21 FEB 2025

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Estd. 1962
"A++" Accredited by NAAC(2021) With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ , कोल्हापूर
## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
AICTE व UGC मान्यताप्राप्त

# Online M.B.A.
पदव्युत्तर शिक्षणाची संधी

❖ **अभ्यासक्रमाची ठळक वैशिष्ट्ये**

- No Entrance , २४/७ शैक्षणिक मार्गदर्शन
- ५ विषयांचे Specializations
- रेकॉर्डेड व्हिडिओ व स्वयंअध्ययन साहित्य
- विषयतज्ज्ञाद्वारे Live संपर्क सत्रांचे आयोजन
- Discussion forum







❖ **फी सवलत वैशिष्ट्ये**

- ✓ महिला व अपंगांना १० % फी सवलत
- ✓ शिवाजी विद्यापीठातून वा संलग्न महाविद्यालयातून पदवी, पदव्युत्तर तसेच शिक्षक व त्यांच्या पाल्यांना १० % फी सवलत
- ✓ कोल्हापूर जिल्हा नागरी सहकारी बँक कर्मचाऱ्यांना १० % फी सवलत
- ✓ फी भरण्यास ४ हफ्त्यांची सोय

❖ **ठळक वैशिष्ट्ये**

- ➢ रोजगाराभिमुख कौशल्यावर भर
- ➢ दुहेरी पदवीची सोय



8459127168
9403850450
8975295297
9370507353

अधिक माहितीसाठी: https://online.unishivaji.ac.in/

Online M.Com. व Online M.Sc.(गणित ) लवकरच सुविधा उपलब्ध होत आहेत

जा. क्र. शिवाजी वि./सीडीओई
दिनांक:

डॉ. व्ही. एन. शिंदे
कुलसचिव